ऐक्य
बुधवार १९/१२/२०१८ अंक ३२८ ३ ₹ पाने ८
मार्गशीर्ष शु. एकादशी/द्वादशी शके १९४० नक्षत्र भरणी मोक्षदा भागवत एकादशी

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव




उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना यशेंद्र क्षीरसागर.

# मराठी साहित्यात जीवनाचे खरेखुरे प्रतिबिंब : यशेंद्र क्षीरसागर

▲ कोरेगाव, दि. १८ : मराठी साहित्यात जीवनाचे खरेखुरे प्रतिबिंब उमटले असून त्यातील आशय विद्यार्थ्यांनी समजून घेतला पाहिजे; असे प्रतिपादन विद्यार्थी मार्गदर्शक वक्ते यशेंद्र क्षीरसागर यांनी केले.

येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात मराठी विभागाच्यावतीने आयोजित वरिष्ठ महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांच्या विशेष कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी डॉ. बाळासाहेब चव्हाण, डॉ. विद्या नावडकर आदी उपस्थित होते. विस्तार अधिकारी आदिल जमादार यांची यावेळी विशेष उपस्थिती होती.

क्षीरसागर म्हणाले, मराठीचा विद्यार्थी हा केवळ गुण कमावणारा नव्हे तर गुणग्राही हवा. मराठी साहित्याचा त्याला समाजाशी संबंध जोडता आला पाहिजे. साहित्य, समाज आणि व्यक्तिमत्त्व यांचे नाते अतूट असते. ते समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्राध्यापकांनी मदत करावी. भाषेचा विद्यार्थी हा सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्वाचा हवा. अभ्यासातील टक्केवारी बरोबरच संवेदनशीलता अत्यंत महत्त्वाची आहे. लोकप्रिय साहित्याबरोबरच बाबूराव बागुल, उद्धव शेळके, विश्राम बेडेकर अशा लेखकांचे साहित्यही विद्यार्थ्यांनी आवर्जून वाचले पाहिजे. गरिबांचे दुःख पाहून कळवळतो तोच खरा भाषेचा विद्यार्थी होय. यावेळी जमादार यांचा सत्कार झाला. प्रा. विद्या नावडकर यांनी आभार मानले.

जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सातारा, पेठ गुरुवार सि.स.नं. १८अ/१ चे आसपास राहणाऱ्या रहिवाशांना व सातारा शहर व लगत पंचक्रोशीतील सर्व लोकांना सदर जाहीर नोटीसीने कळविणेत येते, ते खालीलप्रमाणे : शहर सातारा, पेठ गुरुवार येथील सि.स.नं. १८अ/१ या मिळकतीवर उभारलेल्या 'ओम श्री बालाजी प्राईड' या

जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सातारा, पेठ गुरुवार सि.स.नं. १८अ/१ चे आसपास राहणाऱ्या रहिवाशांना व सातारा